# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 31/01/2020 (शुक्रवार)
# (सकाळ)

---

## चोरी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 05 कि.मी अंतरावर सीएमपीडीआय कॅप खदान क्र. 3 येथे दिनांक 30/01/2020 चे 04:00 वा. दरम्यान डब्लु.सी.एल. चे गार्ड ईंचार्ज व त्यांचा स्टाफ सह डब्लु.सी.एल च्या एरीया मध्ये पेट्रोलिंग करीत असतांना फिर्यादी नामे– निखील सुरेश चवरे, वय 34 वर्ष, रा. हनुमान नगर, कन्हान यांना पाहुन आरोपी नामे क्र. 1) राजेश टिकाराम पटेल, वय 33 वर्ष, 2) प्रमोद विजय सहानी, वय 33 वर्ष व 3) जसवंत श्रीराम सहानी, वय 29 वर्ष, तिन्ही, रा. खदान नं. 3 हे पाईप व आरमर केबल वायर चोरी करुन पडतांना दिसले. आरोपीतांचा पाठलाग केला असता तीन्ही आरोपीतांनी पाईप आणि केबल चोरी करुन पडुन गेले. परत कॅपला येवुन पाहिले असता कॅप मधुन 5 लोखंडी मोठे पाईप किंमती 10,000/–रु. व अंदाजे 30 फुट आरमार तांबा केबल किंमत 20,000/– रू. असा एकुण 30,000/–रु. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम 379, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार येशु जोसेफ 8275871504 हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 5 किमी अंतरावर शाहु धाबा भिवापुर ते नागपूर रोड, उमरेड येथे दिनांक 30/01/2020 चे 07:45 वा. ते 08:30 वा. दरम्यान उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड यांच्यासह फिर्यादी नामे – पो.शि. शैलेंद्र वडलावार हे पो. स्टे परिसरात पेट्रोलिंग करित होते. नाकाबंदी दरम्यान एमच–40/एटी–9791 क्रमांकाचा टिप्परच्या चालकाला शाहु धाबा भिवापुर ते नागपूर रोड येथे थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक आरोपी नामे– बशीर अब्दुल शेख, वय 34 वर्ष, रा. धुरखेडा, ता. उमरेड याच्या ताब्यातील वाहनात विनापरवाना अवैधरित्या 8 ब्रास रेती किं. 28,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण 20,28,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस शिपाई विजय वडलवार, उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय, उमरेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरूण जयसिंगपुरे हे करीत आहे.

## दुखापत

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 2 कि. मी अंतरावर सिम कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक 29/01/2020 चे 10:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेश केवलदास डोहाने, वय 32 वर्ष, रा. समूद्रपूर जि. वर्धा हे कंपनीमध्ये पायदळ जात होते. दरम्यान काळया रंगाच्या कारमधून 4 अज्ञात आरोपी धावत आले व फिर्यादीस थांब म्हणाले. यानंतर फिर्यादी न थांबल्याने फिर्यादीस आरोपीतांनी रस्त्यात अडवून का थांबला नाही, या कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीस काठीने डोक्याला मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 341, 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार दांडेकर 797256916 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि. मी अंतरावर आयडीपी काटोल येथे दिनांक 09/01/2020 चे 08:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विजय रामकृष्ण चिचोळकर, वय 38 वर्ष, रा. काटोल हे आरोपी नामे– दिवाकर ढोक याचे घराचे परीसरात बसले होते. दरम्यान आरोपीने फिर्यादीस लवकर उठ असे म्हणुन काठीने फिर्यादीस डाव्या हाताच्या मनगटावर मारहाण करुन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 326 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अरून भेंडे 9923193642 हे करीत आहे.

3) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 500 मी अंतरावर कन्हयाडोल येथे दिनांक 30/01/2020 चे 18:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– विनोद तातोबाजी चिचूरकर, वय 21 वर्ष, रा. कन्हयाडोल, ता. कळमेश्वर यांना आरोपी नामे– अजय चिटूजी टाले, रा. कन्हयाडोल याने म्हटले की, ''तु माझ्या घरून मटण आणले'' या कारणावरून आरोपीने फिर्यादीच्या हातात असलेल्या कुऱ्हाडने फिर्यादीच्या मानेवर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 326 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ईस्माइल शेख 9423603175 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर